# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. : ०२०–२५६२१०४५
०२०–२५६२१०४८
०२०–२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/४१२ दिनांक – २४/०४/२०२३

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे स्मरणपत्र**

प्रति,
मा. प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व
नॉन–एआयसीटीई अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – **माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS)** वेबपोर्टलवर सन २०२२–२३ या वर्षाची **माहिती नोंदविणेबाबत.**

संदर्भ – मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे–१ यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/**एमआयएस**/२०२२–२३/३५२७, दि. १७ मार्च, २०२३.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाची सांख्यीकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्र शासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांस **DHEMIS वेबपोर्टलव्दारे माहिती १०/०४/२०२३ पर्यंत माहिती भरण्याबाबत सुचित करण्यात आले होते.**

**ज्या महाविद्यांलयांनी** सन २०२२–२३ मध्ये /पूर्वी ज्या महाविद्यालयांना राज्य सरकारकडून मान्यता व प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्नीकरण मिळालेले आहे, अशा सर्व महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक असल्याचे माहित असुन सुध्दा अद्याप माहिती भरलेली नाही अशा संबधित महाविद्यालयांनी भविष्यात होणाऱ्या नुकसानीस संबधीत महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/ मा. नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

संबधीत महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२२–२३ ची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत **"ना–हरकत प्रमाणपत्र"** प्राप्त करून घेणे बंधणकारक आहे याची महाविद्यालयांच्या मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून तात्काळ भरण्यात यावी.

आपला,

(श्री. श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,

प्रत माहितीसाठी –

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. कार्यकारी सहायक, मा. प्र–कुलगुरू कार्यालय,
३. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.